सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १२ ऑगस्ट २०२६

आतील पानावर

पान २– बॉलीवूडमध्ये आता जीवघेणी स्पर्धा
पान ३ – जॉन अब्राहम करणार बँक घोटाळ्यावर चित्रपट
पान ४ – मृणाल ठाकूरने दिलाय थेट इशारा
पान ५ – रश्मिकाची होती अशी इच्छा, पण...
पान ६ – दोन वर्ष कामच मिळालं नाही...

# विकी घेतोय 'महावतार'साठी मेहनत

'प्रेम बॉलिवूड अभिनेता विकी कौशलने 'छावा' चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली होती. या चित्रपटातील त्याच्या दमदार अभिनयासह त्याने केलेल्या ट्रान्सफॉर्मेशनचीही मोठी चर्चा झाली होती. आता विकी पुन्हा एकदा एका मोठ्या आव्हानासाठी सज्ज झाला असून, आगामी 'महावतार' चित्रपटासाठी तो आणखी मोठं फिजिकल ट्रान्सफॉर्मेशन करणार आहे. विकी कौशल लवकरच दिग्दर्शक अमर कौशिक यांच्या 'महावतार' या पौराणिक- ऐतिहासिक चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात तो भगवान परशुराम यांची भूमिका साकारणार आहे. या भूमिकेला न्याय देण्यासाठी विकी तब्बल २५ किलोहून जास्त वजन वाढवणार असल्याची माहिती समोर आली आहे. वृत्तानुसार, विकी सप्टेंबर महिन्यापासून सेलिब्रिटी फिटनेस प्रशिक्षक तेजस लालवानी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रशिक्षण सुरू करणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण डिसेंबर २०२६ मध्ये सुरू होणार असल्याचं सांगितलं जात आहे. निर्माते दिनेश विजान यांच्या या चित्रपटाची प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. 'महावतार' हा बॉलिवूडमधील सर्वाधिक चर्चेत असलेल्या आगामी चित्रपटांपैकी एक मानला जात असून, तो डिसेंबर २०२७ किंवा २०२८ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. 'लव्ह अँड वॉर'साठीही घेतली मोठी मेहनत घेतली आहे. 'महावतार'सोबतच विकी कौशल संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटातही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात तो एअर फोर्स पायलटची भूमिका साकारत असून, त्यासाठीही त्याने विशेष मेहनत घेतली आहे वृत्तानुसार, 'लव्ह अँड वॉर'च्या भूमिकेसाठी विकीने सुरुवातीला सुमारे १२ किलो वजन वाढवलं, तर चित्रपटाच्या क्लायमॅक्सच्या चित्रीकरणासाठी त्याने १५ किलो वजन कमी केलं. या चित्रपटात त्याच्यासोबत आलिया भट आणि रणबीर कपूर प्रमुख भूमिकेत दिसणार असून, हा चित्रपट २१ जानेवारी २०२७ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.







# आमिरच्या 'ललकार'मधून फरहानची एक्झिट?

रोहित आमिर खान आणि आशुतोष गोवारीकर यांचा एकत्रित प्रोजेक्ट 'ललकार' ची सध्या चर्चा आहे. १९५२ च्या भारत- पाकिस्तान टेस्ट सीरिजवर सिनेमा आधारित आहे. सिनेमाची अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही मात्र यामध्ये फरहान अख्तर महत्वाच्या भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा होती. तर गेल्या काही दिवसांपासून फरहान अख्तरने सिनेमातून माघार घेतल्याचंही समोर आलं. त्याच्या जागी सिद्धांत गुप्ताचं नाव समोर आलं. तर आता या सर्व चर्चांवर फरहान अख्तरने मौन सोडलं आहे. आपण या सिनेमाचा अधिकृत भाग नव्हतोच असा त्याने खुलासा केला आहे. एका मुलाखतीत फरहान अख्तरला 'ललकार'मधून बाहेर पडल्याबाबत विचारण्यात आलं. तेव्हा तो म्हणाला, मी एखाद्या प्रोजेक्टमधून कसा बाहेर पडेन जेव्हा की मी त्या प्रोजेक्टमध्ये अधिकृतरित्या आलोच नाही. एखाद्या कलाकाराला करिअरमध्ये अनेक भूमिका ऑफर होत असतात. काही भूमिका ते साईन करतात तर काही करत नाहीत. फरहान अख्तर रितेश सिधवानीसोबत मिळून 'ललकार'ची निर्मिती करणार आहेत. सिद्धांत गुप्ता यामध्ये मुख्य भूमिका निभावणार आहे. सिद्धांत हा ३७ वर्षीय टीव्ही अभिनेता आहे. त्याने 'तलाश ए इश्क' मालिकेत भूमिका साकारली. २०२३ साली आलेल्या 'ज्युबिली' सीरिज मुळे त्याला लोकप्रियता मिळाली. नंतर तो गेल्या वर्षी 'ब्लॅक वॉरंट'मध्ये दिसला. तसंच 'फ्रीडम ऑफ मिडनाईट' या सीरिजमध्ये त्याने जवाहरलाल नेहरुंची भूमिका साकारली.



# डिंपलला नाना नकोसे वाटतात!

ओम 'क्रांतिवीर', 'प्रहार' आणि 'अंगार' यांसारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांमध्ये एकत्र काम करणारे नाना पाटेकर आणि डिंपल कपाडिया हे एकेकाळी बॉलीवूडची लोकप्रिय जोडी मानली जायची. दोघांमध्ये उत्तम मैत्री असतानाही डिंपल कपाडिया यांनी एका मुलाखतीत नाना पाटेकरांबद्दल धक्कादायक वक्तव्य केलं होतं. नाना अत्यंत प्रतिभावान असले तरी त्यांनी त्यांची नकारात्मक अन् भयंकर बाजू लपवून ठेवली आहे, असं डिंपल यांनी म्हटलं होतं. एकाच वेळी नानांच्या अभिनयाचे कौतुक करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची भयंकर बाजू असल्याचं विधान डिंपल यांनी केलं होतं. एका मुलाखतीत डिंपल यांना नाना पाटेकरांबरोबर काम करण्याचा अनुभव कसा होता? असं विचारण्यात आलं होतं. तेव्हा डिंपल म्हणाल्या, चांगल्या आणि वाईट दोन्ही बाजूने. खरं तर ते खूप प्रतिभावान आहेत, यात तिळमात्र शंका नाही. मला त्यांचा अभिनय इतका आवडतो की त्यासाठी मी माझा जीवही देऊ शकते, पण नाना पाटेकरांची एक नकारात्मक बाजू असल्याचंही त्यांनी सांगितलं होतं. मी त्यांची वाईट बाजूही पाहिली आहे. जी आपण सर्वांपासून लपवून ठेवतो. तशीच नकारात्मक बाजू नानांची आहे आणि त्यांनी ती खूप चांगल्या पद्धतीने लपवून ठेवली आहे, असं डिंपल यांनी म्हटलं होतं.

अभिनेता संजय दत्तने त्याच्या चार दशकांच्या दीर्घ करिअरमध्ये फिल्म इंडस्ट्रीत झालेले अनेक बदल जवळून अनुभवले आहेत. एका चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत संजय दत्तने बॉलीवूडच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केले. जेव्हा करिअर सुरू केले तेव्हा ही इंडस्ट्री एका कुटुंबासारखी होती, पण आता इथे अत्यंत जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे, पण याउलट हॉलीवूडमध्ये कलाकारांमध्ये प्रचंड एकजूट असल्याचे त्याने सांगितले. त्याचबरोबर तुरुंगात असताना एका हवालदाराने दिलेला महत्त्वाचा धडाही त्याने सांगितला. बॉलीवूडमधील सुरुवातीच्या दिवसांची आठवण काढत संजय दत्त म्हणाला, मी जेव्हा करिअरला सुरुवात केली होती, तेव्हा ही इंडस्ट्री एका कुटुंबासारखी होती. सगळे एकत्र असायचे आणि एकमेकांना मदत करायचे. पण आता इथे अत्यंत जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. हॉलीवूड

# बॉलीवूडमध्ये आता जीवघेणी स्पर्धा

मात्र आपल्यापेक्षा खूप वेगळे आहे. हॉलीवूडचं कौतुक करत संजय दत्त म्हणाला, तिकडे खूप एकजूट आहे. कलाकार, लेखक एकमेकांना पाठिंबा देतात. तिथे अनेक संस्था कार्यरत आहेत. अगदी ऑस्कर पुरस्कार सोहळ्यातही ही एकी दिसून येते. तिथे एखादा अभिनेता पुरस्कार स्वीकारत असतो, तेव्हा कोणाच्याही मनात असूया नसते आणि सर्वजण एकमेकांचा आनंद साजरा करतात. हे सगळं खूप सुंदर आहे. संजय दत्तने तुरुंगात असताना सर्वात मोठी शिकवण कोणती मिळाली, ते सांगितलं. एका हवालदाराने त्याला माफ करण्याचं महत्त्व शिकवलं. माफ करणं ही गोष्ट मी जेलमध्ये असताना शिकलो. एका हवालदाराने मला ही गोष्ट खूप छान समजावून सांगितली. तो म्हणाला, 'लोकांना माफ करायला शिका, तुम्ही आयुष्यात खूप पुढे जाल.' समोरच्या व्यक्तीने तुम्हाला दुखावलंय हे माहीत असूनही तुम्ही त्याला माफ करता, हाच खरा मोठेपणा आहे, असं संजय दत्त म्हणाला. संजय दत्तने सांगितलं की त्याला गुंडांच्या भूमिका करायला आवडतं. तसेच कोणत्याच भूमिकेसाठी विशिष्ट तयारी करत नसल्याचंही त्याने स्पष्ट केलं. मी विशेष काही करत नाही. मी फक्त कथा ऐकतो, सेटवर जातो आणि दिग्दर्शक जसा सीन सांगेल, तसा तो पूर्ण करतो, असं संजय दत्तने स्पष्ट केलं.





# रकुलने म्हणून स्वीकारली शूर्पणखेची भूमिका

दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटाचा ट्रेलर गेल्या आठवड्यात प्रदर्शित झाला. ट्रेलरमध्ये रणबीर कपूर, साई पल्लवी, यश, लारा दत्ता, रकुल प्रीत सिंह या कलाकारांचे लूक पाहायला मिळाले. एकीकडे या भव्यदिव्य ट्रेलरचे कौतुक होत आहे, पण दुसरीकडे मात्र रणबीर कपूर प्रभू श्रीरामांच्या भूमिकेसाठी योग्य निवड नसल्याची टीकाही होत आहेत. त्याचबरोबर पात्रांनी परिधान केलेले पोशाख आणि विवेक ओबेरॉयसारख्या कलाकारांची अचानक झालेली एन्ट्री यावरूनही बरीच चर्चा होत आहे. या ट्रेलरमध्ये एक महत्त्वाचा सीन दाखवण्यात आला, तो म्हणजे शूर्पणखाचं नाक कापण्याचा. रावणाची बहीण 'शूर्पणखा'च्या भूमिकेत अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आहे. ट्रेलरमध्ये तिची झलक पाहायला मि ळाली. त्यामुळे तिच्या भूमिकेबद्दलही प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. रकुलने ही भूमिका स्वीकारण्यामागचं कारण आता सांगितलं आहे. रकुलने शूर्पणखेची भूमिका स्वीकारण्याच्या निर्णयाचं एका चाहत्याने कौतुक केलं. त्याला उत्तर देताना तिने सांगितलं की, या पात्राची भावनिक गुंतागुंत पाहूनच तिने ही भूमिका करायचं ठरवलं. रकुलने लिहिलं, या सुंदर पत्रासाठी मनापासून आभार. मी शूर्पणखेच्या भूमिकेला होकार दिला, त्यामागे तू उल्लेख केलेलं कारणच होतं-तिच्या आयुष्यातील गुंतागुंत. इतिहास तिला फक्त एका विशिष्ट घटनेसाठीच लक्षात ठेवतो, पण तिच्या कथेत याव्यतिरिक्तही सांगण्यासारखं खूप काही आहे. एक कलाकार म्हणून, लोकांचा दृष्टिकोन बदलणारी आव्हानात्मक पात्रं साकारायला मला आवडतं. त्यामुळे जेव्हा 'रामायण' प्रेक्षकांच्या भेटीला येईल, तेव्हा लोक या पात्राकडे नवीन दृष्टिकोनाने पाहतील अशी आशा आहे.

# सीजेपीची गोष्ट येणार पडद्यावर!

दिल्लीतील जंतर- मंतरवर नीट पेपरफुटी व शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकारांच्या विरोधात आक्रमक आंदोलन करण्यात आले होते. 'कॉक्रोच जनता पार्टी'ने ३६ दिवस केलेल्या आंदोलनाला संपूर्ण देशातून पाठिंबा मिळाला. या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. 'कॉक्रोच जनता पार्टी' आंदोलनाची गोष्ट आता रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. या आंदोलनावर आधारित फीचर फिल्मची तयारी सुरू झाली असून, चित्रपटाचं नाव 'द ॲक्सिडेंटल कॉक्रोच पार्टी' असं निश्चित केले आहे. सुमारे २० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये या चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. गोविंद देव ब्रह्म यांनी या चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटात आंदोलनाची संपूर्ण पार्श्वभूमी, त्यामागील राजकीय घडामोडी आणि आंदोलकांच्या प्रमुख मागण्या मांडल्या जाणार आहेत. निर्मात्यांचा दावा आहे की, हा चित्रपट केवळ आंदोलनातील घटनांपुरता मर्यादित नसून विविध पैलूंवर आधारित असणार आहे. आंदोलनामागील रणनीती, त्यावेळचं राजकारण, आणि राजकीय घडामोडी दाखवण्यात येणार आहे. त्याचबरोबर आतापर्यंत सर्वांसमोर न आलेल्या अनेक गोष्टीही या चित्रपटातून मांडण्यात येणार आहे. त्यामुळे आंदोलनाशी संबंधित अनेक राजकीय घडामोडी प्रेक्षकांसमोर आणल्या जाणार आहेत. पॉलिटिकल ड्रामा असलेल्या या चित्रपटातून, आंदोलनाची पडद्यामागची कहाणी प्रेक्षकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सध्या या चित्रपटाची पटकथा लिहिण्याचं काम सुरू आहे. चित्रपटाची पूर्वतयारी सुरु असून प्री-प्रॉडक्शनची तयारी वेगाने सुरू आहे. याशिवाय चित्रपटाच्या शूटिंगसाठी जागा ठरवण्याचं काम सुरू आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दिग्दर्शक, प्रमुख कलाकार आणि सह-निर्मात्यांबाबत मुंबईमध्ये अंतिम टप्प्यात चर्चा सुरू आहे. मात्र, अद्याप कोणत्याही अभिनेता, अभिनेत्री किंवा दिग्दर्शकाच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.'द ॲक्सिडेंटल कॉक्रोच पार्टी' हा सिनेमा २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. या सिनेमामध्ये अभिजीत दिपके यांच्यासह इतर आंदोलकांच्या भूमिका कोण साकारणार हे अद्याप समोर आलेले नाही.

# जॉन करणार बँक घोटाळ्यावर चित्रपट

अभिनेता जॉन अब्राहम मागील काही काळापासून सत्यघटनांवर आधारित चित्रपटांना प्राधान्य देत आहे. आता जॉन ५५ वर्षांपूर्वी झालेल्या एका बँक घोटाळ्याची कहाणी प्रेक्षकांसमोर आणणार आहे. म ागील वर्षी प्रदर्शित 'द डिप्लोमॅट' चित्रपटानंतर दिग्दर्शक शिवम नायर तसेच अभिनेता जॉन यांची जोडी पुन्हा एकदा वास्तविक घटनेवर आधारित चित्रपट निर्माण करणार आहे. यावेळी दोघेही १९७१ साली दिल्लीत झालेल्या नागरवाला घोटाळ्यावर आधारित चित्रपट निर्माण करतील. या चित्रपटात जॉनसोबत के.के. मेनन यांची महत्त्वाची भूमिका असेल. याची पटकथा पूर्ण झाली असून निर्मितीपूर्व काम वेगाने सुरू आहे. जॉन आणि के.के. मेनन यांच्या तारखाही ठरल्याने चित्रिकरण ९ ऑक्टोबरपासून सुरू केले जाणार आहे. या चित्रपटाची निर्मिती तनुज गर्ग आणि अतुल कसबेकर करत आहेत. चित्रिकरण दिल्लीतच पार पाडण्याची याजना आहे. नागरवाला घोटाळा दिल्लीत २४ मे १९७१ रोजी एसबीआयच्या संसद मार्ग शाखेत झाला होता. तेथे चेकशिवाय रुस्तम सोहराब नागरवालाने ६० लाख रुपयांची रोख रक्कम बँकेतून काढली होती. या प्रकरणाच्या तपासात बँक कॅशियरकडे आलेल्या एका फोन कॉलमध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी तसेच त्यांचे सचिव पी.एन. हक्सर यांच्या आवाजात एका गोपनीय अभियानासाठी ६० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. तर फोन कॉलवर तो आवाज नागरवाला यानेच काढला होता. १९७२ साली त्याचा संशयास्पद मृत्यू झाला होता. जॉन आगामी काळात दिग्दर्शक रोहित शेट्टीचा चित्रपट 'मारिया आयपीएस'मध्ये दिसून येणार आहे. यात तो मुंबईचे माजी पोलीस आयुक्त राकेश मारिया यांची भूमिका साकारत आहे.





# कंगना व हृतिकमध्ये पुन्हा वादाची ठिणगी

हॉलिवूड भाजपा खासदार व अभिनेत्री कंगना रणौत यांनी नीट पेपरफुटी आंदोलन करणाऱ्या तरुण आंदोलकांवर केलेल्या वक्तव्यांमुळे त्या चर्चेमध्ये आल्या आहेत. सोशल मीडियावर त्यांनी या तरुण मुला-मुलींच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली. त्यावरून वाद सुरू असताना हृतिक रोशनचे नाव आले असून, अनेक मीम्स तयार केले जात आहेत. सीजेपी प्रवक्ता सौरव दास यांनीही हृतिक रोशनचा उल्लेख केला होता. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या पोस्टमध्ये कंगना रणौत यांचा एक्स बॉयफ्रेंड हृतिक रोशनचे नाव घेतले जात आहे. त्यावर कमेंट करीत हृतिक रोशनने प्रतिक्रिया दिली. यावरून दोघांमध्ये पुन्हा एकदा वाद-विवाद सुरू झाल्याचे दिसून येत आहे. इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करीत कंगनाने हृतिकला उत्तर दिले आहे. त्यामध्ये त्यांनी हृतिकची गर्लफ्रेंड सबा आझाद हिचाही उल्लेख केला आहे. कंगना रणौत यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट करीत लिहिले, प्रिय हृतिक, तुला तुझी योग्य जोडीदार सबा आझाद भेटली आहे, याचा मला खूप आनंद आहे. तुम्ही दोघं एकत्र नेहमीच चांगले दिसता; पण तू एका कमिटेड रिलेशनशिपमध्ये असताना, एखाद्या स्त्रीबद्दल अशी वक्तव्य करणं, हे तुला शोभत नाही. उलट, जे लोक तुझं नाव वापरून माझा अपमान करीत आहेत आणि मला त्रास देत आहेत, तू त्यांचा विरोध केला पाहिजे. पुढे त्यांनी लिहिलं, आगीत तेल ओतणं थांबव. या पोस्टमध्ये त्यांनी हृतिकने केलेल्या वक्तव्यांवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.



# ‘त्या’ भूमिकेसाठी मला देवानेच निवडलंय

बॉलीवूड नितेश तिवारी दिग्दर्शित भव्यदिव्य ‘रामायण’ या बॉलिवूड चित्रपटात ज्येष्ठ मराठी अभिनेते अजिंक्य देव ऋषी विश्वामित्रांची महत्त्वपूर्ण भूमिका साकारताना दिसणार आहेत. ट्रेलरमध्ये त्यांचा पहिला लूक समोर आला असून प्रेक्षकांकडून त्याला पसंती मिळत आहे. ही भूमिका अत्यंत वास्तववादी पद्धतीने साकारल्याचं श्रेय त्यांनी दिग्दर्शक नितेश तिवारींना दिलंय. माझी या भूमिकेसाठी देवानेच केली, असंही त्यांनी म्हटलंय. हा अनुभव अत्यंत आध्यात्मिक होता आणि ही भूमिका साक्षात देवानेच माझ्या नशिबात लिहिली होती. मी या भूमिकेकडे फक्त एका चित्रपटातील पात्र म्हणून कधीच पाहिलं नाही. ‘रामायण’मधील पात्रांची निवड साक्षात देव करतो, असा माझा विश्वास आहे. त्यामुळेच ऋषी विश्वामित्रांची भूमिका साकारण्यासाठी माझी निवड झाली आहे, असं अजिंक्य देव म्हणाले. पुढे अजिंक्य यांनी सांगितलं की, त्यांनी या भूमिकेसाठी तयार केलेला खास पोशाख आणि प्रोस्थेटिक मेकअप लावला होता. अजिंक्य देव म्हणाले, जेव्हा मी ऋषींची वेशभूषा केल्यावर मी विश्वामित्रांची भूमिका स्वीकारण्यापेक्षा ऋषी विश्वामित्रांनीच माझं अस्तित्व स्वीकारलंय असं मला वाटलं. इतकंच नाही तर सेटवरील सहकलाकार आणि तंत्रज्ञांनी तुम्ही या भूमिकेसाठी अगदी योग्य दिसता, अशा प्रतिक्रिया दिल्यामुळे अजिंक्य यांचा आत्मविश्वास आणखी वाढला. ऋषी विश्वामित्र हे व्यक्तिमत्त्व खूप महान आणि भव्य आहे. त्यामुळे अभिनयात कोणतीही अतिशयोक्ती न होता अभिनय खरा वाटेल, याची काळजी दिग्दर्शक नितेश तिवारी यांनी घेतली, असं त्यांनी सांगितलं. याचं श्रेय नितेश तिवारींना जातं. त्यांनी मला अभिनयात अतिरेक करू दिला नाही किंवा हे पात्र मुळातच भव्य-दिव्य असल्याने तसं करण्याचा प्रयत्नही करू दिला नाही, कारण विश्वामित्रांचे व्यक्तिमत्त्व खूप प्रभावी आहे. त्या पात्राचा लूकच अत्यंत प्रभावी होता आणि नितेश यांनी माझा अभिनय खरा राहील याची काळजी घेतली. रामायणात ऋषी विश्वामित्रांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. चित्रपटात रणबीर कपूर, साई पल्लवी, यश, सनी देओल, अजिंक्य देव, रकुल प्रीत सिंग, रवी दुबे, लारा दत्ता, अरुण गोविलसह अनेक कलाकारांनी यात महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

# मृणाल ठाकूरने दिलाय थेट इशारा



बॉलीवूडमधील अनेक कलाकारांचे फोटो आणि व्हिडिओ वापरून डीपफेक कंटेंट तयार केला जात असल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. याप्रकरणी अनेक कलाकारांनी आवाज उठवत थेट तक्रार दाखल केली आहे. अशीच घटना अभिनेत्री प्रीती झिंटासोबत घडली होती. यानंतर आता अभिनेत्री मृणाल ठाकूरने आक्रमक पवित्रा घेत डीपफेक कटेंट तयार करणाऱ्यांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. यासंदर्भात अभिनेत्रीने सोशल मीडियावरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टद्वारे तिने अशा प्रकारच्या गैरवापराविरोधात कठोर भूमिका घेतली असून भविष्यात तिच्या ओळखीचा गैरवापर झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. मृणालने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली ती म्हणाली, तिची प्रतिमा किंवा आवाज वापरून डीपफेक व्हिडिओ किंवा फोटो तयार करणे आणि ते प्रसारित करणे बेकायदेशीर आहे. अशा प्रकारचे सर्व कंटेंट तात्काळ हटवावे. तसेच असा प्रकार समोर आल्यास कायदेशीर पावले उचलली जातील. असा थेट इशारा अभिनेत्रीने दिला आहे. दरम्यान, मृणालच्या कामाबाबत बोलायचे झाल्यास, यावर्षीच्या सुरुवातीला ती सिद्धांत चतुर्वेदीसोबत ‘दो दीवाने शहर में’ या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात झळकली होती. मुंबईत राहणाऱ्या दोन तरुणांच्या प्रेम, आत्मविश्वास आणि सामाजिक दबावांशी सुरू असलेल्या संघर्षाची कथा या चित्रपटातून मांडण्यात आली होती. यानंतर मृणाल डेव्हिड धवन दिग्दर्शित ‘है जवानी तो इश्क होना है’ या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात दिसली. या चित्रपटात वरुण धवन आणि पूजा हेगडे यांच्याही प्रमुख भूमिका होत्या. तसेच, शनील देव दिग्दर्शित ‘डकैत- एक प्रेम कथा’ या ॲक्शन-ड्रामा चित्रपटात मृणालने आदिवी शेषसोबत काम केले आहे. आता तिच्या आगामी चित्रपटाविषयी चाहत्यांना उत्सुकता आहे.

# अल्लू अर्जूनचं होतं 'या' अभिनेत्रीवर क्रश



दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुन आज पॅन इंडिया स्टार म्हणून ओळखला जातो. 'पुष्पा'मुळे त्याची लोकप्रियता जगभरात पोहोचली असली, तरी त्याच्या आयुष्यात एक असा प्रसंग घडला होता, ज्याची चर्चा आजही होते. अल्लू अर्जूनचं एका बॉलिवूड अभिनेत्रीवर क्रश होतं. पण, जेव्हा त्या अभिनेत्रीचं लग्न झालं, तेव्हा अल्लू अर्जूननं रुम मध्ये स्वत:ला बंद केलेले आणि तो दिवसभर रडत बसला होता. ही गोष्ट स्वतः अल्लू अर्जूनने एका मुलाखतीत उघड केली होती. एका जुन्या मुलाखतीत अल्लू अर्जुनने सांगितले की, लहानपणापासूनच तो श्रीदेवींचा मोठा चाहता होता. त्यांना तो इतका मानायचा की, त्यांच्यासारखी दुसरी अभिनेत्रीच नाही, असे त्याला वाटायचे. अल्लू अर्जुन म्हणालेला, मला श्रीदेवी खूप आवडायच्या. त्या माझ्या सर्वात आवडती अभिनेत्री होत्या. जेव्हा मला कळलं की त्यांनी बोनी कपूर यांच्याशी लग्न केलं आहे, तेव्हा माझा विश्वासच बसला नाही. मी दिवसभर रडत होतो. अल्लू अर्जुनने सांगितले की, त्याच्या वयातील अनेक मुलांसाठी श्रीदेवी 'ड्रीम गर्ल' होत्या, पण त्याच्यासाठी त्या केवळ आवडती अभिनेत्री नव्हत्या , तर त्याचं त्यांच्यावर नितांत प्रेम होतं. त्यामुळे त्यांच्या लग्नाची बातमी ऐकून तो खूपच भावूक झाला होता. श्रीदेवी आणि बोनी कपूर यांनी २ जून १९९६ रोजी शिर्डीत अत्यंत खासगी समारंभात लग्न केले होते. काही महिन्यांनंतर त्यांच्या लग्नाची माहिती सार्वजनिक झाली. त्यावेळी बोनी कपूर आधीच विवाहित असल्यामुळे त्यांच्या लग्नाची मोठी चर्चा झाली होती. दरम्यान, अल्लू अर्जूनच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर तो लवकरच दिग्दर्शक टलीच्या बहुचर्चित 'राका' या सायन्स-फिक्शन आणि ॲक्शन चित्रपटात दिसणार आहे. या पॅन-इंडिया चित्रपटात त्याच्यासोबत दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत आहे.



# विजय सेतुपतीने यामुळे कॅमिओ करणं केलं बंद

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता विजय सेतुपती याने नुकत्याच एका मुलाखतीत आपल्या करिअरशी संबंधित मोठा खुलासा केला आहे. अनेक चित्रपटांमध्ये लक्षवेधी कॅमिओ भूमिका साकारणाऱ्या विजयने आता अशा भूमिका स्वीकारणं बंद केल्याचं सांगितलं. यामागचं कारणही त्याने स्पष्ट केलं आहे. मात्र, रजनीकांत यांच्यासाठी त्याने 'जेलर २'मध्ये अपवाद म्हणून कॅमिओ भूमिका स्वीकारल्याचंही त्याने सांगितले. एका मुलाखतीत विजय सेतुपतीने या निर्णयाबद्दल सांगितलं. तो म्हणाला, मी आता कॅमिओ भूमिका करणं पूर्णपणे बंद केलं आहे. फक्त रजनीकांत सरांसाठी 'जेलर २'मध्ये कॅमिओ केला आहे. तो एक अपवाद आहे. यामागचं कारण स्पष्ट करताना तो म्हणाला की, अनेकदा चित्रपट निर्माते त्याच्या कॅमिओ भूमिकेचा वापर चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अशा पद्धतीने करतात की, जणू तो त्या चित्रपटाचा मुख्य नायक आहे. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये गैरसमज निर्माण होतो आणि त्याचा परिणाम त्याच्या मुख्य भूमिकेतील चित्रपटांवरही होतो. सेतुपती म्हणाला, जर 'जेलर २'च्या पोस्टरवर माझा फोटो असेल, तरी प्रेक्षकांचं लक्ष रजनीकांत सरांकडेच असेल. पण इतर चित्रपटांमध्ये माझ्या कॅमिओचा वापर मार्केटिंगसाठी केला जातो. रजनीकांत यांचा 'कुली' हा चित्रपट २०२५ मध्ये प्रदर्शित झाला होता. आता त्यांच्या सुपरहिट 'जेलर'च्या सीक्वलची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. नेल्सन दिग्दर्शित 'जेलर २' हा चित्रपट १५ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, ४८ वर्षीय विजय सेतुपती सध्या दिग्दर्शक मणिरत्नम यांच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत 'रामायण' फेम अभिनेत्री साई पल्लवी महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# रश्मिकाची होती अशी इच्छा, पण...

रश्मिका मंदानाला तिच्या आगामी 'मैसा' या चित्रपटाच्या सेटवर दुखापत झाली. ही बातमी समोर येताच तिच्या चाहत्यांना चिंता वाटली. सोमवारी रश्मिकाने स्वतः सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत तिच्या आरोग्याबद्दल माहिती दिली आणि ही दुखापत कशी झाली ते सांगितलं. विशेष म्हणजे, सलग तिसऱ्यांदा तिला अशी दुखापत झाली आहे. रश्मिकाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक फोटो आणि एक पोस्ट शेअर केली आहे. तिने लिहिलं की, हॅलो मित्रांनो! दुखापत होणं खरोखरच खूप वाईट असतं आणि ही गोष्ट कोणालाच कळू नये अशी माझी इच्छा होती. असो..., मी काही दिवस गायब होते त्याबद्दल माफ करा, पण आता मी परत आले आहे. ही दुखापत काही दिवसांपूर्वी घडली आणि ही माझी सलग तिसरी दुखापत आहे. माझं शरीर हे माणसाचं आहे, मशीनचं नाही हे मला समजायला हवं. त्यामुळे आता मला मोठा धडा मिळाला आहे. आपल्या दुखापतीबद्दल अधिक माहिती देताना तिने लिहिले, 'मैसा' चित्रपटाच्या एका गाण्याच्या शूटिंगदरम्यान डान्स करताना मला ही दुखापत झाली. हा आतापर्यंतचा माझा सर्वात जबरदस्त डान्स परफॉर्मन्स होता. पण तुम्ही काळजी करू नका. थोडं दुखतंय, पण हे दुखणं मी सहन करतेय. या सर्व दुखापती अचानक आणि विचित्र अपघातांमुळे झाल्या आहेत. काय विचित्र योगायोग आहे ना! ही तर जबरदस्तीने मिळालेली सुट्टी आहे. अर्थात, मी कोणतीही तक्रार करत नाहीये. दुखापतीमुळे वर्कआउट थांबल्याने वजन वाढेल की काय, अशी चिंता रश्मिकाला सतावत आहे. तिने लिहिले, मी दैनंदिन आयुष्यात माझं वजन वाढू न देण्याचा पूर्ण प्रयत्न करते. कारण मी खूप वर्कआउट आणि रनिंग करते, ज्यामुळे मी फिट राहते. पण आता काही दिवस मला वर्कआउट किंवा रनिंग करता येणार नाही. जर रोज व्यायाम केला नाही तर मी फक्त खात राहील. तुम्ही सर्वजण काळजी करू नका. तुम्हा सर्वांना खूप खूप प्रेम! रश्मिकाने ही पोस्ट लिहिताच






# जयंती २ मध्ये दिसणार पायल जाधव?

'अबीर गुलाल' मालिकेतून अभिनेत्री पायल जाधवला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. या मालिकेत ती प्रमुख भूमिकेत दिसली होती. मालिकेत तिच्याबरोबर अक्षय केळकर, शुभांगी लाटकर, गायत्री दातार हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसले होते. 'अबीर गुलाल'बरोबरच पायल 'मानवत मर्डर्स'मध्येही दिसली होती. जुई, थ्री ऑफ अस, बाप ल्योक अशा सिनेमांमध्येही ती दिसली होती. काही दिवसांपूर्वी पायल तारिणी या मालिकेत महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. या मालिकेत तिने साकारलेल्या रेवा या भूमिकेला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले. अभिनेत्री आता लवकरच नवीन सिनेमातून, एका नवीन भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जयंती २, या असे सिनेमाचे नाव आहे. या सिनेमाचे एक पोस्टर सोशल मीडियावर शेअर करण्यात आले आहे. हे पोस्टर शेअर करताना लिहिले, ते काय आहे ज्यामुळे तुमचे, समाजाचे आणि देशाला नुकसान होत आले आहे? ते काय आहे, ज्याचा लोकांना त्रास होत असतो; पण त्यावर बोलायची कुणाचीही तयारी नसते? त्या समस्येवर आता उघडपणे बोलावं लागेल. तरुणांना आणि महिलांना ते सत्य आता जगासमोर मांडावं लागेल. त्यामुळे 'जयंती २'ची चर्चा तर होणारच. पायल जाधवबरोबरच या सिनेमात प्रियदर्शिनी इंदलकरदेखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याबरोबरच, रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, मानसी सुभाष हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. प्रियदर्शिनी इंदलकर महाराष्ट्राची हास्यजत्रा या विनोदी शोमधून लोकप्रिय झाली. तिला या शोमधून मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. तिने काही सिनेमांतही काम केले आहे. फुलराणी, नवरदेव बीएस्सी ॲग्री, गाडी नंबर १७६०, चिकी चिकी बुबूम बूम, गांधी टॉक्स, सोयरीक अशा अनेक सिनेमांत तिने काम केले आहे.

# 'लाडू' पाहून भावूक झाले यशपाल शर्मा



राष्ट्रीय पुरस्कार विजेते शैलेंद्र सिंग यांच्या मराठी दिग्दर्शनातील पहिला चित्रपट 'लाडू' याच्या विशेष स्क्रीनिंगनंतर प्रख्यात अभिनेते यशपाल शर्मा यांनी चित्रपटाचे भरभरून कौतुक करत त्याला आजच्या काळात बनलेला अत्यंत धाडसी आणि मनाला भिडणारा सिनेमा असे संबोधले. चित्रपटाविषयी प्रतिक्रिया देताना यशपाल म्हणाले की, 'लाडू' हे नाव सुरुवातीला साधं वाटलं, पण चित्रपट पाहिल्यानंतर त्यामागचा गाभा आणि भावनिक अर्थ प्रकर्षाने जाणवला. ते पुढे म्हणाले, आज ज्या काळात व्यावसायिक आणि वेगवान चित्रपटांचा बोलबाला आहे, त्या काळात असा आशयप्रधान आणि प्रामाणिक चित्रपट बनवणं हेच मोठं धाडस आहे. त्यासाठी शैलेंद्र सिंग आणि संपूर्ण टीमला सलाम. हा चित्रपट पाहताना ऋत्विक घटक, श्याम बेनेगल आणि सत्यजित रे यांसारख्या दिग्गज दिग्दर्शकांच्या सिनेमांची आठवण झाल्याचेही त्यांनी नमूद केले. भावूक होत त्यांनी सांगितले, मला चित्रपटामुळे नाही, तर आजच्या काळात असा चित्रपट बनवण्याचं धाडस कुणी दाखवलं, याचा विचार करून डोळ्यात पाणी आलं. बॉस इंडिया एंटरटेनमेंट आणि ब्रेडविनर प्रोडक्शन्स प्रस्तुत, सत्य घटनेवर आधारित 'लाडू' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मुंबई, ठाणे आणि कर्जतच्या मातीवर कृष्ण-धवल स्वरूपात चित्रित झालेला हा १०३ मिनिटांचा मराठी चित्रपट मानवी संघर्षाची अत्यंत भावनिक आणि वास्तववादी गाथा मांडतो. हा चित्रपट सत्य घटनेवर आधारित असून सध्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये पाठवला जात आहे. शैलेंद्र सिंग यांनी आता 'लाडू' या चित्रपटाच्या माध्यमातून प्रथमच मराठी दिग्दर्शनात पाऊल ठेवलं आहे.

# दोन वर्ष कामच मिळालं नाही...

मनोरंजनविश्वात काम मिळणं खूप कठीण असतं. आघाडीचे कलाकारही अनेकदा कामासाठी भटकत असतात. एका मराठी अभिनेत्रीने नुकताच तिचा अनुभव सांगितला जेव्हा दोन-दोन वर्ष तिच्याकडे कामच नव्हतं. ही अभिनेत्री आहे अमृता खानविलकर. एका मुलाखतीत अमृता म्हणाली, हे फेजेस माझ्या आयुष्यात वेगवेगळ्या वेळी आले होते. 'कट्यार काळजात घुसली'नंतर माझ्याकडे २ वर्ष काम नव्हतं. तो सिनेमा खूप छान होता, हिटही झाला होता. मला वाटलं आता आपल्याला खूप काम मिळणार. पण २ वर्ष काम मिळालं नाही. त्यानंतर मी 'राजी' सिनेमा केला. मग आता मी काय तक्रार करु? मग 'चंद्रमुखी' सिनेमानंतरही दोन वर्ष माझ्याकडे काम आलं नाही. पण त्यावेळची अमृता आणि 'चंद्रमुखी' नंतरची अमृतामध्ये खूप फरक होता. कारण मला माहित होतं लोकांना कळणार नाही की हिला नक्की कुठे कास्ट करायचंय? कारण हिने आता टायट्युलर रोल केलेला आहे, निर्माती म्हणूनही काम पाहिलं आहे आणि आता हिला छोटे रोल, चार पाच सीन्सच्या भूमिका विचारुन चालणार नाही. मग हिला नक्की कोणत्या कामासाठी विचारायचंय? आमच्याकडे तशी स्क्रिप्टच नाहीये. यात आपली काहीच चूक नसते लोकच गोंधळात पडतात. आता मी 'तस्करी' सीरिज केली. 'रामभूमी' हा माझा सिनेमा येतोय. त्यामुळे चांगलं काम येण्यासाठी वेळ लागतो. मग ते हिंदी असो मराठी असो किंवा साउथ इंडस्ट्री असो चांगलं काम येण्यासाठी वाट पाहावी लागते. नेहा पेंडसेने सुद्धा 'जून' सिनेमानंतर आत्ता 'तिघी' सिनेमा केला. किंवा प्राजक्ता माळीनेही 'फुलवंती' नंतर ती आता कोणत्याही मोठ्या सिनेमात दिसलेली नाही. त्यामुळे वेळ लागतो. त्या वेळात तुम्ही फिरायला जाऊ शकता, एखादा छंद जोपासू शकता, मी पियानो शिकत होते पण ते सुटलं. मला वाटतं स्वत:ला कामात व्यग्र ठेवणं गरजेचं आहे. मला फिटनेस ही अशी गोष्ट आहे जिने कायम आधार दिला. मी योगाचा सर्टिफिकेशन कोर्स केला. स्कुबा डायव्हिंग शिकले. तर कलाकार म्हणून तुम्ही या वेळेचा वापर करु शकता. कारण कधी काम मिळेल माहित नसतं. ऑडिशन्सला जावं लागतं, असे तिने सांगितले.



# 'व्हिनस ऑफ दि स्क्रीन' रुपेरी पडद्यावरची सौंदर्य देवताः मधुबाला

'थंडी हवा काली घटा, आही गयी झुमके। प्यार लिये डोले हसी, नाचे जिया झुमके ।।' 'मिस्टर अँड मिसेस ५५' या चित्रपटातील संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या तारुण्य प्रसवणाऱ्या मूडमधील गीता दत्तच्या जादुई आवाजात, पडद्यावर हातातील छत्र्या गोल फिरवित महामिश्कील मधुबाला व तिच्या दोन सख्यावर हे गाणे खुमासदारपणे चित्रित झाले. मधुबालाचा दिलखुलास अभिनय व फाळके अवॉर्ड विनर व्ही. के. मूर्ती यांच्या छायाचित्रणाच्या आविष्काराने हा प्रसंग व हे गाणे आजतागायत लक्षात आहे. खरे सांगू! मधुबालाने सदा हसत राहावे, फुलपाखरासारखे स्वच्छंद बागडावे, सदा रोमँटिक मूड उजागर करावा. परमेश्वराने तिला पृथ्वीवर दुसऱ्यांना प्रेमाच्या नशेत डुंबण्यासाठीच पाठविले. म्हणूनच की काय, प्रत्यक्ष देविका राणीने तिचे मुमताज नाव बदलून मधुबाला ठेवले. मधुबाला म्हणजे मधुशालेतील साकी. जी जगाला सुखद नशा प्रदान करून दुःख विसरायला लावते.

'मै मधुबाला! मधुशाला की मधुबाला का क्षण क्षण बनकर मतवालार। उषा का दीप लिए सर पर। मै आयी करती उजीयाला। मैने इसमे जीवन डाला मै मधुबाला! मधुशाला की मधुबाला' हिंदीतील ख्यातनाम कवी हरिवंश राय बच्चन यांनी १९४० च्या दरम्यान लिहिलेल्या 'मधुशाला' कवितेतील या ओळी मधुबालाच्या जीवनाशी जुळतात. मधुबाला म्हणजे साक्षात स्वर्गातून उतरलेली परीच होती, असे फिल्म इंडियाचे सर्वेसर्वा बाबुराव पटेल म्हणायचे. केदार शर्मा यांच्या १९४६ सालच्या 'नीलकमल' चित्रपटाद्वारे बेबी मुमताजचे मधुबाला व रणवीर कपूरचे राज कपूर म्हणून बारसे झाले. 'आयेगा आयेगा आयेगा आनेवाला...' मधुबालाला १९५० साली 'महल' या बिग बॅनरच्या चित्रपटात संधी मिळाली. वरील आयकॉनिक गाण्याने मधुबाला व लता मंगेशकर यांचे भाग्य उजळले. या गूढरम्य चित्रपटात आशा व कामिनी ही दोन व्यक्तिमत्त्वे अत्यंत अनुभवी अभिनेत्रीसारखी अभिनित केली व देशभरच्या आकाशात मधुबाला नावाचा तारा देदीप्यमान झाला.

'तेरे सदके बलम न करे कोई गम' १९५४ सालच्या 'अमर' चित्रपटात नायकाची नाराजी दूर करण्यासाठी या गाण्यातून ती प्रयत्न करते. वरील ओळ म्हणून मोठी अंगडाई देऊन छद्मी हास्यातून त्याला चिडविण्याचा अभिनय करताना गोड शिसारी आणते. संगीत कला ही चित्तवृत्तीना जन्म देते. चित्तवृत्तींना उजाळा देऊन खऱ्या अर्थी मधुबाला सौंदर्यवान बनली. 'नैन मिले नैन हुये बावरे। चैन कहाँ मेरे सजन सावरे।' १९५१ च्या 'तराना' चित्रपटाच्या दरम्यान मधुबाला व दिलीपकुमारचे खर्या अर्थी पडद्याबाहेरील प्रेम फुलले होते.




त्याचा आविष्कार या गाण्यात पाहायला मिळाला. मधुबालाने या गाण्यातील प्रत्येक कडव्यात लडिवाळप्रेमाचे अलग अलग भाव अभिनित केले. मधुबालाच्या जीवनातील माईल स्टोन म्हणजे 'मुगल-ए-आझम' चित्रपटात साकारलेली अनारकलीची भूमिका! निमिष मिटलेल्या अवस्थेत पुतळ्याच्या रूपात तिचे संगमरवरी सौंदर्य प्रदर्शित केले. पुतळा अवस्थेतून वास्तवात आल्यावर निमिषाचे आवरण झुगारल्यावरचे तिच्या नेत्रकमलाचे सौंदर्यही निर्मात्याने दर्शकांना दाखविले. एका प्रसंगात एक्स्ट्रिम क्लोजअपमध्ये दिलीपकुमार तिच्या चेहर्यावर पांढऱ्या पक्ष्याचे लांब पीस फिरवून तिला कुरवाळतो. ती लज्जेने पापण्या मिटून आत्यंतिक प्रेमभाव चेहर्यावर प्रकट करते. या लांब शॉटमध्ये एकही संवाद नाही. 'जब रात है ऐसी मतवाली तो सुबह का आलम क्या होगा' मधुबाला व निगार सुलताना यांच्यातील या कव्वालीनंतर सलीम निगारला गुलाब देतो व मधुबालाला काट्याची दांडी देतो. त्यावर मधुबाला उत्तर देते. 'जाह-ए-नसीब, काटों को मुरझ्याने का खौफ नही. फूल तो मुरझ्या जाते है लेकिन काटे दामन थाम लेते है।' अनारकलीला साखळदंडात बांधून शिपाई अकबर बादशाहच्या समोर आणून ढकलतात. ती जमिनीवर आपटते. मुश्किलीने उठून मानेला हिसका देताना तिच्या घामाने थबथबलेल्या चेहर्यावर व डोळ्यात अन्यायाची भावना अभिनित करतांनाचे अप्रतिम संवाद! संवादफेकीत निष्णात असलेले पृथ्वीराज व मधुबाला यांच्या जुगलबंदीचा हा प्रसंग खूप लोकप्रिय झाला होता. 'तन भीगा है, सर गीला है । उसका कोई पेच भी ढिला है' 'चलती का नाम गाडी' चित्रपटातील प्रसंग- जागेपनी पडलेल्या स्वप्नात समोर प्रत्यक्ष लावण्य उभे असल्यामुळे क्षणभर गोंधळल्यावर किशोरकुमार वरील अंतर्यात तिला चिडविण्याचा अवखळ प्रयत्न करताना ओलेती स्वरूपातील मधुबाला, लटक्या कोपात भिवया वक्र करून लज्जा व अनुरागाच्या आविर्भावात तिच्या लोभस अभिनयाचे क्लोजअप कॅमेरामनने अचूक टिपले.

'फूल से गालोपे रुकने को तरसता पानी' 'बरसात की रात' या चित्रपटातील हे गाणे. यशस्वी प्रेमाच्या कल्पनेत रमलेल्या मधुबाला, वरील रेडिओवर प्रियकराने तिला उद्देशून गायलेले गाणे ऐकत गाण्याबर हुकूम मोहरून गेल्याचा अभिनय जिवंतपणे साकारतात. ओल्या केसांवरून ओघळणारे जलबिंदू खोडकरपणे तिच्या कपोलावर काही क्षण थांबतात. तेव्हा कपोल थरथरून गुदगुल्या झाल्याचा अभिनय केवळ अप्रतिम! साहिरचे काव्य व मधुबालाचा अभिनय! सारेच दिव्य! १४ फेब्रुवारी १९३३ रोजी बालपणी बेबी मुमताज नावाचे हे गुलाबपुष्प दिल्ली येथील अताउल्लाखां यांच्या संसारबागेत उमलले. तिला बालपणापासून गुलाब फार आवडायचा. तिच्याबरोबर काम करणार्या नायकांना ती गुलाब द्यायची. तिच्या वैयक्तिक जीवनात तिला अतोनात शारीरिक व मानसिक यातना सहन कराव्या लागल्या. १६ ऑक्टोबर १९६० रोजी ती किशोरकुमारची (अब्दुल करीम)ची बीबी झाली. तिला सवाष्ण म्हणून कुंकू लेवून देवाघरी जायचा दिवस आला. २३ फेब्रुवारी १९६९ रोजी हे देवाघरचे लेणे देवाघरी गेले. जणू पृथ्वीवरील सौंदर्य संपले. कुणीतरी तिच्या अस्तित्वातील दिवसांबद्दल लिहून ठेवले होते... 'वो दिन भी क्या दिन थे जब पसीना गुलाब था'

**रमेश पतंगे**

# क्रांती रेडकरच्या नव्या चित्रपटाची घोषणा!



आयुष्यातील काही नाती बदलतात, काही दूर जातात, पण मैत्रीचं नातं यापलीकडचं असतं. अनेक मैत्रीचे किस्से आपण ऐकलेले असतात किंवा मग पाहिलेले असतात. मैत्रीच्या दिवशी म्हणजेच फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने अभिनेत्री आणि दिग्दर्शिका क्रांती रेडकर वानखेडे हिने सोशल मीडियावरुन एक खास गिफ्ट चाहत्यांना दिलं आहे. मैत्रीच्या शब्दांपलीकडच्या नात्यावर भाष्य करणार्या 'मैत्रेया' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे.

लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. समर टाईम्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन क्रांती रेडकर वानखेडे यांनी केले आहे. 'काकण'सारख्या संवेदनशील चित्रपटानंतर त्या पुन्हा एकदा वेगळ्या आणि भावनिक विषयासह प्रेक्षकांसमोर येत आहेत. चित्रपटाची निर्मिती मनोज खळतकर यांनी केली आहे. चित्रपटाच्या पोस्टरमधून समर, आयुषी, स्काय आणि रुची या चार प्रमुख पात्रांची ओळख करून देण्यात आली आहे. या चार जणांच्या आयुष्याभोवती कथा फिरणार असल्याचे संकेत पोस्टरमधून मिळतात. मात्र, त्यांच्या नात्याचे नेमके स्वरूप काय आहे आणि कथेत कोणते भावनिक पैलू उलगडणार आहेत, याबाबत अद्याप गुप्तता राखण्यात आली आहे. चित्रपटाविषयी बोलताना क्रांती रेडकर वानखेडे म्हणाल्या, 'मैत्रेया' ही प्रत्येकाच्या आयुष्यातील अशा मैत्रीची गोष्ट आहे, जी काळ बदलला तरी मनाच्या एका खास कोपऱ्यात कायम राहते. या चित्रपटात मैत्रीचे विविध रंग, नात्यांमधील गुंतागुंत आणि आयुष्याची अनपेक्षित वळणं प्रेक्षकांना अनुभवायला मिळतील.

'काकण'नंतर आणखी एक वेगळी आणि भावनिक कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना खूप आनंद होत आहे. हा प्रवास लवकरच सर्वांसोबत शेअर करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.'मैत्रेया'च्या घोषणेनंतर या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, या चित्रपटाशी संबंधित अधिक माहिती समोर येण्याची चाहत्यांना प्रतीक्षा लागली आहे.



# यामी बॉलीवूडला ठोकणार होती रामराम

मनोरंजनविश्वात असे अनेक कलाकार आहेत, जे उत्तम अभिनयकौशल्य असूनही त्यांना चांगल्या किंवा मनासारख्या भूमिका मिळत नाहीत. त्यामुळे काही कलाकार इंडस्ट्री सोडण्याचाही निर्णय घेतात. अभिनेत्री यामी गौतमनेही एकेकाळी बॉलिवूडला कायमचा रामराम करण्याचा निर्णय घेतला होता. यामीने बॉलिवूड सोडून हिमाचल प्रदेशातील तिच्या मूळ गावी परत जाण्याचं ठरवलं होतं. तिच्या या निर्णयाला कुटुंबीयांनीही पाठिंबा दिला होता. मात्र, त्यानंतर एका रात्रीत तिचं नशीब पालटलं आणि तिने तिचा निर्णय बदलला. एका मुलाखतीत यामीने याबाबत खुलासा केला. ती म्हणाली की, 'विकी डोनर' हा तिचा बॉलिवूडमधील पहिला हिट ठरलेला चित्रपट आहे, तरीही अनेकांच्या मते तिचा चित्रपट तितका यशस्वी ठरला नव्हता. करिअरमध्ये पुढे जाण्याच्या दबावामुळे काही वेळा तिने मनविरुद्ध जाऊनही भूमिका स्वीकारल्याचंही सांगितलं. मुलाखतीत तिला, कधी इंडस्ट्री सोडण्याचा विचार केला होता का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर यामीने होकारार्थी उत्तर देत त्या काळातील अनुभव सांगितला. यामी म्हणाली, हो. उरी आणि बाला या चित्रपटांपूर्वी मी बॉलिवूड सोडण्याचा निर्णय घेतला होता. मी पूर्णपणे वेगळं आयुष्य सुरू करण्याची कल्पनाही करून ठेवली होती. ज्या क्षणी मी भीतीपोटी इंडस्ट्रीत टिकून राहण्याचा प्रयत्न करणं सोडलं, त्याच क्षणापासून माझ्या आयुष्यात सर्व काही बदललं. त्यानंतर तिला दिग्दर्शक आदित्य धरच्या 'उरी' चित्रपटाची ऑफर मिळाली. त्यानंतर 'बाला' हा चित्रपटही वाट्याला आला. या दोन्ही चित्रपटांच्या यशामुळे यामीचं करिअर एका रात्रीत बदललं. यामी पुढे म्हणाली की, इंडस्ट्रीतून बाहेर पडण्याच्या भीतीमुळे प्रत्येक गोष्टीला 'हो' म्हणणं तिने ज्या दिवशी थांबवलं, त्या दिवसापासून आयुष्यात सकारात्मक बदल घडू लागले.

# अभिनेत्रीने लग्नानंतर पाचव्याच दिवशी घेतला घटस्फोट

टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्रीने एक मोठा खुलासा केला आहे. लग्न केल्यानंतर सासरी मानसिकरित्या त्रास झाल्याने तिला लग्नाच्या पाचव्याच दिवशी घटस्फोट घेऊन पुन्हा माहेरी यायचं होतं. ही अभिनेत्री म्हणजे टीना पारेख. 'कहानी घर घर की' मालिकेत साक्षी तन्वरच्या मुलीच्या भूमिकेत दिसलेल्या टीनाने नुकत्याच एका व्हिडीओच्या माध्यमातून हा खुलासा केला आहे. टीना पारेखने नुकतीच इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत लग्नाच्या २० व्या वाढदिवसानिमित्त एक खास आठवण चाहत्यांसोबत शेअर केली. टीना पारेख आता ४७ वर्षांची झाली असून २००८ मध्ये तिने टीव्ही इंडस्ट्रीला निरोप दिला होता. इंस्टाग्राम पोस्टमध्ये तिने तिच्या लग्नातील एक खास किस्सा सांगितला. तिने तिच्या लग्नात वहिनीची जुनी साडी नेसली होती, याशिवाय लग्नात तिने आई-बहिणीचे दागिने परिधान केले होते. टीनाने तिच्या पोस्टमध्ये लिहिले, २० वर्षांपूर्वी जेव्हा मी वैवाहिक आयुष्याच्या या प्रवासात पाऊल ठेवले, तेव्हा मला आयुष्यातील जवळच्या स्त्रीयांचा आशीर्वाद हवा होता. म्हणूनच मी आई, बहीण आणि आजीचे खास दागिने परिधान लूक ब्रायडल लूक केला होता. विशेष म्हणजे टीनाने लग्नासाठी कोणत्याही अलिशान हॉटेलची किंवा डेस्टिनेशन वेडिंगची निवड न करता श्री श्री रवीशंकर यांच्या आश्रमाची निवड केली होती. २००७ मध्ये तिने प्रसिद्ध संगीतकार विक्रम हजरा यांच्यासोबत अत्यंत साध्या पद्धतीने श्री श्री रविशंकर यांच्या आश्रमात विवाह केला. काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत टीनाने खुलासा केला होता की, लग्नाच्या अवघ्या पाचव्या दिवशी तिला नवर्यापासून घटस्फोट घेऊन आपल्या माहेरी परत जायचे होते. कारण सुरुवातीला विक्रमचे कुटुंबीय या लग्नावर खूश नव्हते. यामुळे ती मानसिकदृष्ट्या खूप अस्वस्थ झाली होती आणि तिने विक्रमला स्पष्ट शब्दांत सांगितले होते की तिला तिच्या घरी परत जायचे आहे. पण नंतर मात्र दोघांच्या नात्यातील अनेक अडचणी दूर झाल्या आणि त्यांनी एकमेकांना २० वर्ष सोबत दिली आहे.

# 'हीर रांझा' मधून साराचा पत्ता कट?

अभिनेता रोहित सराफ 'मिसमॅच्ड' च्या शेवटच्या सीझनचं शूट करत आहे. या सीरिजने रोहित सराफला ओळख दिली. तो वरुण धवनसोबत 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'मध्येही दिसला. याशिवाय 'हीर रांझा' सिनेमामध्येही त्याची वर्णी लागली आहे. सिनेमा 'धुरंधर' फेम सारा अर्जुन मुख्य भूमिकेत दिसणार होती. मात्र आता सारा या सिनेमाचा भाग नसणार अशी माहिती समोर आली आहे. रोहितच्या अपोझिट एका नव्या अभिनेत्रीचा शोध सुरु आहे. 'हीर रांझा' या लोकप्रिय कथेवर आधारित सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

सप्टेंबर महिन्यात याचं फर्स्ट शेड्युलचं शूट सुरु होणार आहे. इम्तियाज अली यांनी लिहिलेली कथा आणि साजिद अली सिनेमा दिग्दर्शित करणार आहे. सिनेमात रोहित सराफचं नाव जवळपास कन्फर्म झालं आहे. तर सारा अर्जुनच्या नावाची चर्चा असतानाच आता साराच्या हातून हा सिनेमा गेल्याचं समोर आलं आहे. तसंच 'लापता लेडीज'फेम नितांशी गोयलच्या नावाचीही चर्चा आहे. दिग्दर्शक साजिद अली यांनी सप्टेंबरमध्ये सिनेमाचं शूट सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या त्यांची टीम लोकेशन आणि स्क्रीनप्ले फायनल करत आहे. रोहित 'मिसमॅच्ड ४'चं शूट संपवून या सिनेमाच्या तयारीला लागणार आहे. दरम्यान सिनेमाच्या मुख्य अभिनेत्रीवर अद्याप शिक्कामोर्तब झालेला नाही. येत्या काही दिवसात कास्ट फायनल होईल असा अंदाज आहे.

